# बृहन्मुंबई पोलीस आयुक्तालय

**प्रेसनोट** दिनांक २७/०५/२०२६

---

दरवर्षीप्रमाणे दिनांक २८/०५/२०२६ रोजी ''**बकरी ईद**'' सण बृहन्मुंबईमध्ये मोठया उत्साहात साजरा करण्यात येणार आहे. मुस्लिम बांधव मस्जिद, दर्गा, मदरसा इ. ठिकाणी मोठया संख्येने एकत्र येवून नमाज पठण करून कुर्बानीचा कार्यक्रम करतात.

दिनांक २८/०५/२०२६ रोजी बृहन्मुंबई शहरामध्ये ''बकरी ईद'' सणानिमित्त कायदा व सुव्यवस्था राखणेकामी मा. पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई यांच्या मार्गदर्शनाखाली व मा. पोलीस सह आयुक्त (का.व सु.), बृहन्मुंबई यांचे देखरेखीखाली बंदोबस्ताचे नियोजन करण्यात आलेले आहे.

''बकरी ईद'' सण सुरक्षितपणे व निर्विघ्नपणे साजरा करता यावा याकरीता मुंबई पोलीस दलाकडून सणाच्या काळात **किमान ०८ अपर पोलीस आयुक्त, २१ पोलीस उप आयुक्त, ६१ सहायक पोलीस आयुक्त, १९८० पोलीस अधिकारी, १०११० पोलीस अंमलदार** बंदोबस्ताकामी तैनात करण्यात आलेले आहेत. त्यांचेसोबत आरसीपी, अॅन्टी डेमो टिम तैनात करण्यात आलेली आहे तसेच महत्वाच्या ठिकाणी एस.आर.पी.एफ. प्लाटुन, दंगल नियंत्रण पथक, जलद प्रतिसाद पथक, डेल्टा, कॉम्बॅक्ट, तसेच, होमगार्डस् अशा चोख पोलीस बंदोबस्ताचे नियोजन करण्यात आलेले आहे.

तरी, बृहन्मुंबई पोलीस दलातर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, गर्दीच्या ठिकाणी संयम दाखवून पोलीसांना सहकार्य करावे, बेवारस वस्तू आढळल्यास पोलीसांना त्याबाबत तात्काळ माहिती दयावी, सर्व नागरिकांनी नियमांचे भान ठेवून ''बकरी ईद'' सण उत्साहाने साजरा करण्यात यावा. नागरिकांनी तात्काळ पोलीस मदतीसाठी १००/११२ या हेल्पलाईन क्रमांकावर संपर्क साधावा.

****